# प्रेसनोट

दि. १०/१०/२०२३

सहकारी संस्था, केडगांव, जिल्हा पुणे येथील उपलेखापरिक्षक यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गुरनं. ७१२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, भा.दं.वि. क. २०१. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५६ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | रविंद्र ज्ञानेश्वर गाडे, वय ५१ वर्ष, पद - उपलेखापरिक्षक (वर्ग-३), सहकारी संस्था, केडगांव, जिल्हा - पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये (दहा हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ८,५००/- रुपये (आठ हजार पोचशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०६/१०/२०२३ |
| सापळा दिनांक | ०९/१०/२०२३ |

ठिकाण :- तहसिलदार कचेरी, सासवड, पुणे या कार्यालयाचे समोर.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे विकास सेवा सहकारी सोसायटी लिमीटेड, दौंड, पुणे येथे सचिव म्हणून नोकरीस आहेत. सदर संस्थेमार्फत शेतक-यांना कर्ज देणे व कर्जाची वसुली करणे हे काम केले जाते. शेतक-यांकडून कर्जाची वसुली ५० टक्क्यापेक्षा जास्त असेल तर शासनाकडून (सहकार खाते) संस्थेस अनुदान मिळते. त्याकरीता तालुका ऑडीटरकडून लेखापरिक्षण करणे आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव तक्रारदार यांनी लोकसेवक रविंद्र गाडे, तालुका ऑडीटर, केडगांव, दौंड, पुणे यांचेकडे दिला होता. लोकसेवक रविंद्र गाडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या संस्थेचा सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन वर्षाचे सक्षमीकरणाचे प्रस्तावावरील शिफारसीकरीता १०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक रविंद्र गाडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या संस्थेचा सक्षमीकरणाचे प्रस्तावावरील शिफारसीकरीता ८,५००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, ८,५००/- रुपये (आठ हजार पाचशे रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. लोकसेवक रविंद्र गाडे यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.